


Marathi

# चला जी.एस.टी. समजून घेऊया

लेखन- डॉ गिरीश कुमार तिवारी

चित्रांकन- आकाश तपादार

**Stories speak...!**

Stories are the heartbeat of life, weaving together the bittersweet moments that shape our existence. They ignite our spirit, empower us to face life's challenges, and guide us through the complexities of the world. From the digital age to women's rights, from nature conservation to the pursuit of livelihood, and from embracing life's trials to exercising our right to vote – these stories illuminate the path to a meaningful life. Stories woven around 'Critical Life Skills' not only entertain but also cultivate wisdom, enhance our reasoning, and teach us the art of making informed and thoughtful decisions. Step into the narrative, reflect deeply, and let the stories lead you forward!

**Coordinator:** Prof. Usha Sharma, Professor & In-charge, Cell for National Centre for Literacy, NCERT, New Delhi

**Writer:** Dr. Girish Kumar Tiwari

**Illustrations:** Akash Tapadar

**Typography:** Rahul Anil Rathod, Director, Illusion Productions, Mumbai

**Layout:** Mohd. Nazim, Designer

**Translation:** Central Institute of Indian Languages, Mysore

**Reviewer:** Central Institute of Indian Languages, Mysore

**Guidance:** Prof. Nina Sabnani, Animator and Guest Faculty, Department of Design, IIT Hyderabad

**Acknowledgements:**

Akshay Kumar Dixit, Mentor Teacher, Delhi Administration

Shyam Singh Sushil, Writer

Dr. Vibhuti Pandya, Head, Animation & Multimedia Department, BIT Jaipur

Gautam Goswami, Assistant Professor, Animation & Multimedia Department, BIT Jaipur

**IIT Hyderabad:** Dr. Prasad S. Onkar, Associate Professor and Head, Department of Design; Prof. Deepak John Matthew, Professor, Department of Design; Delwyn Jude Remedios, Assistant Professor, Department of Design; Ankita Roy, Assistant Professor, Department of Design; Dr. Mohd. Shahid, Assistant Professor, Department of Design; Dr. Saurav Deori, Assistant Professor, Department of Design; Dr. Shuhita Bhattacharjee, Assistant Professor, Department of Liberal Arts

Mohd. Shah Alam, Senior Consultant (ICT), Cell for National Centre for Literacy, NCERT

Bhawna Khera, Junior Project Fellow, Cell for National Centre for Literacy, NCERT

# चला जी.एस.टी. समजून घेऊया


लेखन

डॉ गिरीश कुमार तिवारी


चित्रांकन


आकाश तपादार



राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद्

NATIONAL COUNCIL OF EDUCATIONAL RESEARCH AND TRAINING


नमस्कार. माझे नाव मुकेश आहे.
गेल्या उन्हाळ्यातील सुट्टीची ही गोष्ट आहे. त्या सुट्ट्या खास होत्या कारण मी आणि माझे तीन मित्र-रमेश, सुरेश आणि गणेश-एकत्र गोव्याला जाणार होतो.
यावेळी सुट्ट्यांमध्ये आपण सर्वजण खूप मजा करू.
होय, मला आता राहवत नाही.
आता वेळ न घालवता स्टेशनवर जाऊन तिकीट बुक करूया. मग पॅकिंग देखील करायचे आहे.



बाळा, सर्व सामान घेतलंस का?
हो आई, मी सगळं घेतलंय.
आम्ही चारही मित्रांनी आमचे सर्व सामान घेतले आहे.
गोव्याला जायचा दिवस अखेर आला. आम्ही सगळे खूप उत्साहात होतो.
आमची ट्रेन आली!


गोवा जं
DONE
मी हॉटेल बुक केले आणि स्टेशनवरून सरळ तिथे पोहोचलो.
सर, मी तुमच्या हॉटेलमध्ये मुकेशच्या नावाने चार जणांसाठी एक खोली बुक केली आहे.
होय सर, कृपया आपण चौघेही आपले आधार कार्ड द्या.
हॉटेलच्या कर्मचाऱ्याने सर्वांच्या आधारकार्डची फोटोकॉपी केली.
आणि आम्हाला रजिस्टरवर सही करायला सांगितली.




मी आमच्या खोलीची चावी घेतली...
पण जेव्हा मी सामान घेऊन पायऱ्यांकडे वळलो, तेव्हा मला काहीतरी आठवले.
सर, तुम्ही मला माझ्या आधार कार्डची फोटोकॉपी देऊ शकता का?
घ्या सर.
आम्ही एक अतिशय महत्त्वाचे काम करायला विसरलो होतो.
अरे मुकेश भाऊ, तू काय लिहित आहेस?
इथेही अभ्यास?
काही सांगशील का?


आपण नेहमी त्यावर फोटोकॉपीचा उद्देश लिहिला पाहिजे.
मी तर म्हणेन की तुम्हीही अवश्य लिहा.
यामुळे तुमच्या कागदपत्रांचा गैरवापर होण्याची शक्यता कमी होते.
भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
मुकेश
12-10-1996
पुरुष
4442 3256 4895
या आधार कार्डाच्या फोटोकॉपीचा एकमेव उद्देश म्हणजे, हॉटेल गिरीश इनमध्ये खोली बुक करण्यासाठी त्याचा वापर केला जाईल
आणि मला देखील!
अरे मला दाखवा की हे कसे लिहावे.
चला, लांब असण्याचा काही तरी फायदा झाला.



दुसऱ्या दिवशी आम्ही सर्व गोवा फिरायला बाहेर पडलो.






गोव्यामध्ये काही दिवस घालवल्यानंतर आता घरी परतण्याची वेळ आली होती
सर, आमचे बिल द्या.
घ्या सर, तुमचे बिल आहे ₹2499 आणि 18% जी.एस.टी. सह एकूण ₹2949 झाले आहे.
घ्या सर, तुमचे 2799 रुपये.
अरे! हे कमी आहेत. पूर्ण पैसे द्या.
नाही. आमचे पैसे इतकेच होतात. तुम्ही जास्त जी.एस.टी. लादली आहे.
नाही. मी अगदी योग्य बिल सांगितले आहे. मी हे काम दररोज करतो.


नाही नाही
हो हो हो
एवढा आवाज ऐकून हॉटेलचा मॅनेजर पण तिथे आला.
मी त्यांना सर्व सांगितलं
आणि त्यानं बिल पण दाखवलं


सर, तुम्ही बिलात लिहिलेल्या रकमेइतकेच पैसे द्यावे लागतील.
पण हे चुकीचे आहे. जी.एस.टी.चे नियम आणि अटी बदलल्या आहेत हे तुम्हाला माहीत नाही का?
अरे मुकेश, आपल्याला उशीर होतोय आणि टॅक्सीही आली आहे.
रमेश, हे लोक जास्त पैसे मागत आहेत.
पण का?
कारण त्यांनी जीएसटी जास्त लावला आहे.
सर, मुकेश बरोबर बोलतोय. आम्ही जे योग्य असेल तेवढेच पैसे देऊ.
आम्हाला उशीर होतोय. आमचा मुद्दा समजून घ्या.


मला ते सर्व माहित नाही. मी तुम्हाला पूर्ण पैसे दिल्याशिवाय जाऊ देणार नाही.
आता आपण त्यांना कसं समजावायचं
मित्रांनो, आपली ट्रेन चुकता कमा नये. ह्यांना समजावण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग नाही का?
आता आपण काय करूया?
आमचा टॅक्सी ड्रायव्हरही वाट पाहत आहे.



तेव्हा माझ्या लक्षात आले की भारत सरकारच्या वेबसाइटवर जी.एस.टी. बाबतीत सर्व माहिती आहे.
हे पहा, 18 जुलै 2022 पासून जी.एस.टी.च्या नियम आणि अटी बदलल्या आहेत.
यानुसार, जर तुमच्या बिलाची किमान रक्कम 1001 रुपये आणि कमाल रक्कम 7500 रुपये असेल तर त्यावर 12% जीएसटी लागू होईल.
आणि जर ती रक्कम 7500 रुपयांपेक्षा जास्त असेल तर त्यावर 18% जी.एस.टी. लागू होईल.
आम्हाला माफ करा सर. यापुढे आम्ही बदलत्या नियमांची देखील पूर्ण माहिती ठेवू आणि आजपासूनच त्यांची अंमलबजावणी करू.
मग योग्य ते बिल भरून आम्ही चौघेही टॅक्सीत बसलो आणि स्टेशनकडे निघालो



लवकर चला!!!
डाबर
वेळेवर स्टेशनवर पोहोचलो.
उफ़ !!
आम्ही गोव्यातून सुट्टीच्या अनेक गोड आठवणी घेऊन घरी जात होतो.
तर ही होती आमच्या उन्हाळयाच्या सुट्टीची रोमांचक कथा.


सा विद्या या विमुक्तये


**CELL FOR NATIONAL CENTRE FOR LITERACY**


**राष्ट्रीय साक्षरता केंद्र–प्रकोष्ठ**












# Story Books

Based on Critical Life Skills





































राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद्
NATIONAL COUNCIL OF EDUCATIONAL RESEARCH AND TRAINING